

दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोलीना (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २३३ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.२९ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

पालिकेच्या निवडणुका नसत्या तर इतका विरोध झाला नसता

उद्धव ठाकरेंच्या विरोधामागे राजकारणच असल्याचा फडणवीस यांचा दावा

सह्याद्रीचा राखणदार । मुंबई (वृत्तसंस्था)–पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याच्या मुद्द्यावरून काढण्यात येत असलेल्या मोर्चावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टीका केली आहे. ही केवळ राजकीय भूमिका आहे असे मी म्हणणार नाही. कोणाच्याही समोर प्रश्नचिन्ह निर्माण करणार नाही. मात्र महानगरपालिकेच्या निवडणुका नसत्या तर कदाचित इतका वेगळ्या पद्धतीने विरोध झाला नसता. असा दावा फडणवीस यांनी केला आहे.मनसे प्रमुख राज ठाकरे हे माझे चांगले मित्र आहेत. म्हणून काय झाले? मात्र त्यांच्या काही भूमिका आहेत. तर माझ्या काही भूमिका आहेत. सर्वांच्या सारख्या भूमिका असत्या तर सर्व एका पक्षात राहिले असते. त्यामुळे भूमिका वेगळ्या असू शकतात. मात्र उद्धव ठाकरे यांनी जर एखादा रिपोर्ट स्वीकारला आणि आता त्याच्या विरोधात ते बोलताय, तर याचा अर्थ केवळ राजकीयच आहे. या राज्यात माशेलकर, मुणगेकर, सुखदेव थोरात यांच्यासारख्या लोकांवर प्रश्नचिन्ह लावता येईल का? असा प्रतिप्रश्न फडणवीस यांनी विचारला आहे.

त्रिभाषा शिकवण्यामागचे खरे कारण

मराठी आणि हिंदी कॉम्पिटिशन झाली तर पहिली मराठीच निवडली जाईल. मराठी सोबत कोणतीही कॉम्पिटिशन नाही. मात्र त्याचवेळी आमच्या मुलांना तीन भाषा शिकायच्या आहे. तीन भाषा शिकले नाही तर नवीन शैक्षणिक धोरणाप्रमाणे क्रेडिट मिळणार नाही. नवीन भाषा न शिकल्यामुळे मराठी विद्यार्थ्यांचे क्रेडिट कमी होणार आहे. त्यामुळे चांगले मार्क घेऊन देखील राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये मराठी विद्यार्थ्यांचा नंबर लागणार नाही. हे मराठी भाषिक विद्यार्थ्यांना मागे ओढण्यासारखे आहे.

देवेंद्र फडणवीस यांना राजकारण करायचय, त्यामुळे देवेंद्र फडणवीस काहीतरी करतोय. मात्र या लोकांना देखील राजकारण करायचे आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. अशा लोकांनी जर एखादा रिपोर्ट दिला आणि तो तुम्ही स्वीकारला आहे. आता तुम्ही त्यालाच विरोध करता? याचा अर्थ मराठीचा प्रेम नाही तर राजकारण असल्याचा स्पष्ट आरोप देखील फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला आहे.



हा मुद्दा भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजून घ्यायचा

राज्यातील संस्थांमध्ये डमिशन तुम्ही ठरवाल. मात्र राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये सर्व निवड सिईटीने होत आहे. यात आपण मराठी मुलांचे नुकसान करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. हा मुद्दा भावनेपेक्षा वस्तुस्थिती समजून घ्यायचा आहे, असे आवाहन देखील त्यांनी केले. सत्तेत असताना वस्तुस्थिती समजून घ्यायची, कमिटी तयार करायची, त्यांचा रिपोर्ट स्विकारायचा, आणि विरोधी पक्षात गेल्यानंतर भूमिका बदलायची? अशा शब्दात विविध फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे.

परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयामागचे कारणही सांगितले. यामागे एक सायंटिफिक प्रोसेस आहे. या प्रोसेस मध्ये आपले विद्यार्थी पुढे कसे गेले पाहिजे, या दृष्टिकोनातून तयार केलेले त्रिभाषा सूत्र आहे. ते तयार करत असताना विद्यार्थ्यांची बुद्धी सर्वात जास्त कधी चालते, भाषा शिकण्याची शक्यता कधी अधिक असते. या संदर्भातले रिसर्च करून त्या कालावधीमध्ये त्यांना भाषा शिकवल्या तर ते अधिकच्या भाषा शिकू शकतात, अशा प्रकारचा मुद्दा समोर आला. हा आमच्यासाठी प्रतिष्ठेचा विषय नाही. कुठलीही भाषा शिका, हिंदीच शिकली पाहिजे असे नाही. हे आम्ही एका मिनिटात सांगितले. हिंदी सक्तीला यांचा विरोध नाही तर यांचा विरोध केवळ हिंदीला आहे. भारतामध्ये तुम्हाला इंग्रजी चालते, तीला तुमचा विरोध नाही. परकीय भाषा चालते मग भारतीय हिंदी का चालत नाही? असा प्रश्न देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला.

गिरगाव शासकीय आश्रमशाळेत नववीच्या विद्यार्थिनीची आत्महत्या

वसतिगृहात भीतीचे वातावरण

सह्याद्रीचा राखणदार । पालघर (प्रतिनिधी)–तलासरी तालुक्यातील गिरगाव शासकीय आश्रमशाळेतील नववी इयत्तेतील विद्यार्थिनीने वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी दुपारी घडली. पल्लवी शरद खोटरे (वय १४, रा. दाभाडी–वांगणपाडा, ता. डहाणू) असे मृत विद्यार्थिनीचे नाव असून या घटनेमुळे वसतिगृहात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पल्लवी खोटरे ही विद्यार्थिनी सुट्टीनंतर शुक्रवारीच शाळेत परतली होती. सकाळी तिचे नातेवाईक तिला वसतिगृहात सोडून गेले. दुपारी, तब्येत बरी नसल्याचे कारण देत तिच्या वर्गातील दोन विद्यार्थिनींनी तिला वसतिगृहात नेले. काही वेळातच पल्लवीने वसतिगृहाच्या पहिल्या मजल्यावरील लोखंडी अँगलला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून जीवनयात्रा संपवली.

आदिवासी विद्यार्थिनीची आत्महत्या

* वसतिगृहात सुरक्षेचा आणि पर्यवेक्षणाचा अभाव
* समुपदेशन सुविधा उपलब्ध नसल्याचा गंभीर मुद्दा
* पालकांचा प्रशासनावर रोष
* सामाजिक संघटनांची कारवाईची मागणी



पल्लवीच्या आत्महत्येचे नेमके कारण अस्पष्ट असले तरी मानसिक तणाव, कौटुंबिक अडचणी, शैक्षणिक दडपण आणि भावनिक अस्थैर्य यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्महत्येच्या घटना वाढत असल्याचे चित्र पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. विशेषतः आदिवासी भागातील आश्रमशाळांमध्ये समुपदेशनाच्या सेवांचा अभाव हा चिंतेचा विषय बनला आहे.या घटनेनंतर पल्लवीच्या कुटुंबीयांसह अनेक पालकांनी शाळा प्रशासनाच्या निष्काळजीपणावर तीव्र संताप व्यक्त केला. शनिवारी अनेक पालकांनी घाबरून आपली मुले शाळेतून घरी नेली. मुलींसाठी योग्य पर्यवेक्षण व भावनिक आधार उपलब्ध असता, ही दुर्दैवी घटना टाळता आली असती, असे काही पालकांचे म्हणणे आहे.
उलगुलान ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष अशोक शिंगाडा आणि इतर सामाजिक कार्यकर्त्यांनी शाळा प्रशासनावर कारवाईची मागणी केली आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच तलासरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पल्लवीचे पार्थिव शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले होते आणि शनिवारी तिच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. आत्महत्येच्या पार्श्वभूमीतील सामाजिक वा कौटुंबिक कारणांचा तपास सुरू आहे.



दारूबंदीचा 'सह्याद्रीचा राखणदार' इम्पॅक्ट!

विठाईत पोलिसांची गस्त; दारू विक्रेत्यांवर धडक कारवाईची शक्यता

'सह्याद्रीचा राखणदार'च्या वृत्तामुळे प्रशासनाची झोप उडाली

सह्याद्रीचा राखणदार । धुळे (उमाकांत अहिरराव): साक्री तालुक्यातील विठाई गावात अवैध दारू विक्रीचा सामना करणाऱ्या ग्रामस्थांच्या संघर्षाला अखेर यश आले असून, दै सह्याद्रीचा राखणदारच्या वृत्तामुळे प्रशासनाला जाग येत गस्त मोहीम सुरु करण्यात आली आहे. गावात पुन्हा एकदा कायदा व सुव्यवस्थेचे संकेत दिसू लागले आहेत.


दैनिक सह्याद्रीचा राखणदार
दारूविक्रीला आळा न घातल्यास साक्री पोलिस ठाण्यावर मोर्चा!
विटाईतील तरुणांचा एल्गार

गेल्या सात-आठ वर्षांपासून गावात यशस्वीपणे दारूबंदी पाळली जात होती. मात्र, मागील दोन महिन्यांपासून काही कथित व्यक्तींनी पुन्हा दारू विक्री सुरू केल्याने ग्रामस्थ संतप्त झाले. गावातील तरुणांनी यास विरोध करत दैनिक सह्याद्रीचा राखणदारचे प्रतिनिधी बोलावले आणि संपूर्ण प्रकरणाचे गांभीर्य माध्यमांमार्फत मांडले.
या वृत्तानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. साक्री पोलीस ठाण्याचे अधिकारी बागुल, उपसहाय्यक प्रसाद रौंदळ, तसेच महिला पोलीस कर्मचारी यांच्या पथकाने तातडीने विठाई गावात गस्त सुरू केली. यामुळे गावात पुन्हा एकदा दहशतीला आळा बसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.
गावकऱ्यांनी यापूर्वी स्पष्ट इशारा दिला होता की, जर त्वरित कारवाई झाली नाही, तर साक्री पोलीस ठाण्यावर एल्गार मोर्चा काढला जाईल. त्या पार्श्वभूमीवर ही हालचाल अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.पोलीस प्रशासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेत तात्काळ गस्त सुरू केल्याने अवैध दारू विक्रेत्यांवर लवकरच धडक कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



करडे गावातील प्राईम कोल्ड कंपनीत चोरी

७७ हजार रुपयांच्या केबल्स आणि तांब्याच्या पट्टीवर चोरट्यांचा हात साफ

सह्याद्रीचा राखणदार । शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील करडे गावात औद्योगिक सुरक्षेला आव्हान देणारी एक गंभीर घटना नुकतीच समोर आली आहे. येथील प्राईम कोल्ड स्टोरेज प्रा. लि. या थंडसाठवणुकीच्या कंपनीत, रात्रीच्या अंधारात तीन अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून सुमारे ७७ हजार रुपयांचा विद्युत साहित्याचा मुद्देमाल लंपास केल्याची माहिती पुढे आली आहे. ही घटना २५ जून रोजी पहाटे तीन ते साडेतीन वाजेच्या सुमारास घडली.
प्रशांत शशीभूषण मंडल (वय ३५) या मूळ पश्चिम बंगालमधील खडकपूर येथील व्यक्तीने शिरूर पोलीस ठाण्यात यासंदर्भात फिर्याद दाखल केली आहे. सध्या ते करडे गावातील गेस्ट हाऊसवर वास्तव्यास असून, प्राईम कोल्ड कंपनीत एच.आर. एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या तक्रारीनुसार, चोरट्यांनी कंपनीच्या स्टोअर रूममधील उघड्या खिडकीतून प्रवेश करत, स्टोअर, कॉम्प्रेसर आणि डिझेल रूम या तीन ठिकाणी चोरी केली. चोरट्यांनी वायर आणि



अर्थिंगसाठी वापरली जाणारी तांब्याची पट्टी अत्यंत नियोजनपूर्वकपणे कापून नेली असून, या घटनेत कंपनीच्या सुरक्षा व्यवस्थेतील त्रुटी ठळकपणे समोर आल्या आहेत.
चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये ३५ एम.एम. जाडीची २०० मीटर वायर, १६ एम.एम. जाडीची १०० मीटर वायर, २.५ एम.एम. जाडीची २०० मीटर वायर आणि १० मीटर लांबीची तांब्याची पट्टी यांचा समावेश असून, एकूण अंदाजे किंमत सुमारे ७७ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे कंपनी प्रशासन व परिसरातील अन्य औद्योगिक क्षेत्रातही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.
या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ४५५/२०२५ अन्वये भादंवि कलम ३०५ (–), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, प्राथमिक चौकशी पोलीस नाईक भगत यांनी नोंदवली आहे. पोलिसांनी कंपनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, काही कामगार व बाहेरील व्यक्तींवर संशय घेतला जात आहे. या घटनेचा तपास लवकर उकलून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी कंपनी प्रशासन व स्थानिक व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे.ही घटना केवळ मालमत्तेची चोरी नसून, वाढत्या औद्योगिक विस्ताराच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेच्या बाबतीत प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची गरज अधोरेखित करणारी आहे. शिरूरसारख्या झपाट्याने वाढणाऱ्या औद्योगिक पट्ट्यात अशा घटनांनी उद्योगजगतात भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे.

वैजापूरमध्ये महिला कीर्तनकाराची क्रूर हत्या

डोक्यात दगड घालून केले ठार

परिसरात भीतीचं वातावरण

सह्याद्रीचा राखणदार । वैजापूर । अर्जुन शिंदे

वैजापूर तालुक्यात एकाच महिन्यात तीन हत्या घडल्याने गुन्हेगारी वाढीचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला असतानाच, चिंचडगाव येथे एका महिला कीर्तनकाराची डोक्यात दगड घालून क्रूर हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सद्गुरु नारायणगिरी कन्या आश्रमात वास्तव्यास असलेल्या ह.भ.प. संगीता पवार (वय ५०) यांची अज्ञात व्यक्तींनी निर्घृणपणे हत्या केली असून, चोरीच्या उद्देशाने ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज आहे.गंगापूर-वैजापूर महामार्गावरील चिंचडगाव येथील आश्रमात संगीता पवार मागील दोन महिन्यांपासून वास्तव्यास होत्या. अविवाहित असून संन्यास जीवन स्वीकारलेली ही साध्वी परिसरात कीर्तनकार म्हणून परिचित होत्या. त्या नियमित धार्मिक कार्यक्रम घेत असत व आश्रमातच राहात. बुधवारच्या रात्री त्या खोलीबाहेर झोपल्या असताना, मध्यरात्री ११ ते १२ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी आश्रमाचे गेट व कुलूप तोडून आत प्रवेश केला. यावेळी



त्यांना जाग आलेल्या संगीता ताईंवर त्यांनी डोक्यात मोठा दगड घालून प्राणघातक हल्ला केला.
घटनास्थळी मोहटा देवी मंदिराची दानपेटीही चोरीला गेली असून, त्यामुळे हत्या ही चोरीच्या उद्देशानेच झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गुरुवारी पहाटे सहा वाजता मंदिराचे पुजारी शिवाजी चौधरी आश्रमात आले असता गेट व कुलूप तोडलेले दिसले. त्यांनी आत प्रवेश करताच संगीता रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळल्या. यानंतर त्यांनी तातडीने गावकऱ्यांना आणि वैजापूर पोलीस ठाण्याला याची माहिती दिली.माहिती मिळताच पोलीस पथक, श्वान पथकासह घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला. घटनास्थळी मोहटा देवी मंदिराची दानपेटीही गायब असल्याचे पोलिसांना तपासात आढळले आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.या घटनेमुळे चिंचडगाव परिसरात भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, धार्मिक स्थळांमध्ये सुरक्षा व्यवस्थेच्या अभावाची चर्चा रंगली आहे. संगीता पवार या त्यांच्या कीर्तनकार्यामुळे गावागावात परिचित होत्या. त्यांच्या क्रूर हत्येने नागरिक सुन्न झाले असून, पोलीस प्रशासनाने लवकरात लवकर गुन्हेगारांना अटक करून कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांनी केली आहे.घटनेची माहिती मिळताच आमदार रमेश बोरनारे यांनी घटनास्थळी भेट दिली असून, तपास यंत्रणांनी तत्काळ हालचाली सुरू केल्या आहेत. विरगाव पोलीस ठाण्याने जनतेला आवाहन केलं आहे की, या प्रकरणासंदर्भात कोणतीही माहिती असल्यास पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.या हत्येच्या घटनेमुळे धार्मिक आश्रम व मंदिरांमधील रात्रीची सुरक्षा यंत्रणा ही केवळ औपचारिक न राहता प्रभावी आणि सक्षम असणं गरजेचं असल्याचं पुन्हा अधोरेखित झालं आहे.



मूल येथे विद्यार्थी करिअर व व्यक्तिमत्त्व विकास मार्गदर्शन आणि गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा

ना.मुनगंटीवार यांच्या प्रेरणेतून उपक्रमाचे आयोजन; प्रखर विचारवंत गणेशदादा शिंदे करणार विशेष मार्गदर्शन



सह्याद्रीचा राखणदार । मूल । प्रतिनिधी

दहावी व बारावीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालांनंतर विद्यार्थ्यांसमोर करिअर निवडण्याचा महत्त्वाचा टप्पा उभा असतो. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या करिअरबाबत योग्य दिशा मिळावी तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधावा, या उद्देशाने २९ जून २०२५ रोजी सकाळी १२ वाजता मूल येथील स्व. मा. सां. कन्नमवार सभागृहात विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन व सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.हा कार्यक्रम महाराष्ट्र राज्याचे माजी वने, सांस्कृतिक व मत्स्यपालन मंत्री आणि बल्लारपूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या प्रेरणेतून घेण्यात येत आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून सुधीर मुनगंटीवार यांची उपस्थिती लाभणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजप जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा असून, प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्षा व भाजप जिल्हा महामंत्री संध्या गुरनुले, जिल्हा महासचिव डॉ. मंगेश गुलवाडे, मुल शहर अध्यक्ष प्रभाकर भोयर, माजी उपाध्यक्ष न.प. नंदकिशोर रणदिवे, माजी नगराध्यक्ष प्रा. रत्नमाला भोयर, माजी नगराध्यक्ष उषा शेंडे, माजी पंचायत समिती सभापती चंदू मारगोनवार, पूजा डोहणे, महासचिव अजय गोगुलवार, चंद्रकांत आस्टनकर, अविनाश जगताप, मोतीलाल टहलियानी, प्रविण मोहूर्ले यांच्यासह अनेक मान्यवर व शिक्षण क्षेत्रातील निवृत्त प्राचार्य व मुख्याध्यापक यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ते आणि प्रखर विचारवंत गणेश शिंदे (पुणे) यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. त्यांनी यापूर्वी हजारो विद्यार्थ्यांना करिअर आणि व्यक्तिमत्त्व विकासाबाबत दिशा दिली असून त्यांची अनेक भाषणे युट्युबवर देखील लोकप्रिय आहेत. हे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरणार आहे.या कार्यक्रमात मुल शहर व तालुक्यातील दहावी व बारावी परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता पक्ष शिक्षक आघाडी, मूल शहर व तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

विनोद कुरुमकर यांची जिल्हा संपर्क प्रमुखपदी निवड

प्रामाणिक कार्यशैलीला व्यापारी बांधवांचा सलाम

सह्याद्रीचा राखणदार । पाटस । प्रतिनिधी

दौंड तालुक्यातील पाटस गावचे सुपुत्र आणि सामाजिक व व्यापारी क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेले विनोद कुरुमकर यांची पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघाच्या जिल्हा संपर्क प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीतून त्यांच्या प्रामाणिक कार्यशैलीची, व्यापारी बांधवांप्रती असलेल्या निष्ठेची आणि संघटनात्मक क्षमतेची पावती मिळाली आहे.



विनोद कुरुमकर हे २०१५ पासून पाटस ग्रामविकास फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कामात सक्रिय आहेत. समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची तळमळ त्यांनी नेहमीच जपली. व्यवसायात यशस्वी वाटचाल करत असतानाच त्यांनी व्यापाऱ्यांच्या प्रश्नांकडेही गांभीर्याने लक्ष दिले. विशेषतः २०१९ च्या कोरोनाच्या कठीण काळात व्यापारी वर्गाला भेडसावणाऱ्या समस्या त्यांनी जवळून पाहिल्या. याच अनुभवातून प्रेरणा घेत त्यांनी पाटस व्यापारी संस्था स्थापन केली आणि स्थानिक व्यापारी बांधवांना एकत्र आणण्याचा उपक्रम हाती घेतला.या संस्थेमार्फत त्यांनी व्यापारी मेळावे, मार्गदर्शन शिबिरे आयोजित करत, अनेक व्यापाऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी ठोस प्रयत्न केले. या व्यावसायिक कार्यांसोबतच सामाजिक उत्तरदायित्व जपत दरवर्षी २६ जानेवारीला रक्तदान शिबिर, तसेच संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात व्यापारी संस्थेच्या वतीने नाश्ता आणि बिस्किटांचे वाटप असे उपक्रमही ते सातत्याने राबवत आले आहेत.

व्यापाऱ्यांच्या समस्या केवळ वैयक्तिक नव्हे, तर सामूहिक पातळीवर सोडवाव्यात, यासाठी त्यांनी रात्रंदिवस मेहनत घेतली. त्यांच्या अशाच अथक प्रयत्नांची दखल घेत पुणे जिल्हा रिटेल व्यापारी संघाच्या मुख्य कार्यकारिणीत त्यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशात पाटस व्यापारी संस्थेतील सहकारी, पदाधिकारी, संचालक मंडळ आणि व्यापारी बांधवांचा मोठा वाटा असून, ही निवड संपूर्ण दौंड तालुक्यासाठी गौरवाची बाब मानली जात आहे.सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छांचा ओघ सुरू आहे.

आम्ही कोकणकर संघटनेचा कोकण सन्मान सोहळा १३ जुलै रोजी दादरच्या शिवाजी मंदिरात

सह्याद्रीचा राखणदार । मुंबई (प्रतिनिधी)–कोकणच्या मातीतील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना एकत्र आणत आणि त्यांच्या कार्याचा गौरव करत आम्ही कोकणकर संघटनेच्या वतीने कोकण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, दिनांक १३ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी ७.३० वाजता श्री शिवाजी नाट्य मंदिर, दादर (मुंबई) येथे संपन्न होणार आहे.

आम्ही कोकणकर ही संघटना गेली दहा वर्षे कोकणातील तरुण पिढीला एकत्र आणत, कोकणच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि कलात्मक क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहे. विशेषतः कोकणातील कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, त्यांना योग्य संधी मिळवून देण्यासाठी ही संघटना सातत्याने कार्य करत आहे.

कोकण सन्मान सोहळा या कार्यक्रमाद्वारे कोकणातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव केला जाणार आहे. कार्यक्रमात धमाल कॉमेडी, प्रबोधनपर मनोरंजन, आणि कोकणवासीयांसाठी खास सांस्कृतिक सादरीकरण पाहायला मिळणार आहे. हा सोहळा सर्व रसिक प्रेक्षकांसाठी मोफत असून, कोकणवासीयांनी आपल्या परिवारासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे संस्थापक, लेखक व दिग्दर्शक कृष्णा येद्रे यांनी केले आहे.कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य असून, प्रवेशिका व अधिक माहितीसाठी ९७७३१४२८१९ / ८६५२१४१५६१ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सर्वज्ञ कॉन्व्हेन्टचा दुसरा वर्धापन दिन २ जुलैला उत्साहात संपन्न होणार

सह्याद्रीचा राखणदार । चिमूर । प्रतिनिधी

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील सर्वज्ञ बहुद्देशीय शिक्षण संस्था द्वारा संचालित सर्वज्ञ कॉन्व्हेन्ट च्या दुसऱ्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन बुधवार, दिनांक २ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. दिगांबर सहारे तर उद्घाटक म्हणून नायब तहसीलदार देवराव निकुरे (चिमूर) यांची उपस्थिती लाभणार आहे. यावेळी राज्य प्रशिक्षण संस्था यशदा, पुणे येथील राज्य प्रशिक्षक उद्धव साबळे हे मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहतील.

प्रमुख पाहुणे म्हणून साईश वारजूकर (सरपंच, ग्रा. पं. शंकरपूर), अशोक ज्ञा. चौधरी (उपसरपंच), प्रा. अशोक चरडे (जिल्हा सेवाधिकारी, चंद्रपूर), विठ्ठलराव सावरकर (उपसर्वाधिकारी, चंद्रपूर), संस्थेचे अध्यक्ष वसंता चौधरी व सचिव भोजराज शेंडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक व शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे सहसचिव राजेंद्र समर्थ, कोषाध्यक्ष राजेंद्र चौधरी, सदस्य पंकज रासेकर, संतोष शिवरकर, जयेश चौधरी, सदस्या प्रतिभा डहाट, प्रेमा शेंडे, ओमिता चौधरी तसेच मुख्याध्यापिका यश्वकला ढोक व आचल चौधरी यांनी केले आहे.


चिमूर विधानसभेची ओळख चंदनाची विधानसभा निर्मितीसाठी एक पाऊल पुढे

सह्याद्रीचा राखणदार । चिमूर । शेषराव राऊत



डॉ. अजय घनश्याम पिसे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या घनश्यामजीपिसे कृषी संशोधन केंद्राच्या प्रयत्नांमुळे चिमूर विधानसभा क्षेत्रात चंदन लागवडीचा एक नवा अध्याय सुरू झाला आहे. डॉ. पिसे यांनी 'चिमूर विधानसभा ही चंदनाची विधानसभा' म्हणून साकारलेले स्वप्न आता प्रत्यक्षात उतरू लागले आहे.या उपक्रमाअंतर्गत यावर्षी मान्सूनपूर्व कालावधीत चिमूर व नागभीड परिसरात १००० हून अधिक चंदनाची रोपे शेतकऱ्यांनी लावली आहेत. हे एक मोठे यश असून, चंदन शेतीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे.घनश्यामजी पिसे कृषी संशोधन केंद्राच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी चंदन लागवडीचे महत्त्व, त्याची बाजारपेठ आणि आर्थिक फायदे समजून घेतले. केंद्राच्या सततच्या प्रशिक्षण, मार्गदर्शन व रोपे उपलब्धतेमुळे शेतकऱ्यांचा उत्साह वाढला आहे. डॉ. अजय पिसे यांनी सांगितले की, चंदन शेती ही शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन आर्थिक सुरक्षेचा एक चांगला पर्याय आहे. येत्या काही वर्षांत चिमूर विधानसभा ही संपूर्ण महाराष्ट्रात चंदनाचे क्षेत्र म्हणून ओळखली जाईल, असा आमचा विश्वास आहे.या उपक्रमामुळे चिमूर आणि नागभीड तालुक्यातील शेतकऱ्यांना नवा आत्मविश्वास मिळाला असून, येत्या काही दिवसातच आणखी मोठ्या प्रमाणात चंदनाची लागवड होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मूल–गडचिरोली मार्गावर चौसिंगा हरणीला वाहनाची धडक; तात्काळ उपचार करून चंद्रपूरला हलवले



सह्याद्रीचा राखणदार । मूल । प्रतिनिधी

मूल–गडचिरोली रोडवरील आकापुर गावाजवळ आज सकाळी सुमारे ९.१५ वाजता एका अज्ञात वाहनाच्या धडकेत एक मादी चौसिंगा हरणी गंभीर जखमी झाली. अपघाताची माहिती मिळताच वनविभाग आणि पर्यावरण प्रेमींनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत हरणीला वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

घटनास्थळी वनरक्षक एस. डब्लू. बोनलवार, संजीवन पर्यावरण संस्थेचे उमेशसिंह झिरे, दिनेश खेवले आणि मनोज रणदिवे यांनी तातडीने पोहोचून नियंत्रण घेतले. याचवेळी माजी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप छौनकर यांनी घटनास्थळीच जखमी हरणीवर प्राथमिक उपचार केले.प्राथमिक उपचार झाल्यानंतर मादी चौसिंगा हरणीला सावली वनपरिक्षेत्र कार्यालयात हलवण्यात आले. वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील उपचारासाठी तिला तात्काळ चंद्रपूर येथील प्राणी उपचार केंद्रात रवाना करण्यात आले. या तातडीच्या कारवाईमुळे जखमी हरणीच्या प्राणाला दिलासा मिळाल्याची शक्यता असून, तिच्यावर वैद्यकीय देखरेख सुरू आहे. वनविभाग आणि स्थानिक पर्यावरण संस्थेच्या तत्परतेमुळे प्राणीसंवर्धनासाठी एक सकारात्मक उदाहरण घडले आहे. दरम्यान, या घटनेमुळे वन्य प्राणी रस्त्यांवर येण्याचे प्रमाण आणि वाहनचालकांची बेफिकीरी यावर चिंतेचे सावट निर्माण झाले असून, वाहनचालकांनी अशा भागांमध्ये वेग मर्यादेचे पालन करण्याची मागणी वनप्रेमींकडून होत आहे.

ठाण्यात खंडणी विरोधी पथकाची मोठी कारवाई : दोन गावठी पिस्तुलं व जिवंत काडतूससह सराईत गुन्हेगार जेरबंद



सह्याद्रीचा राखणदार । रविंद्र धारवणे । ठाणे

ठाणे शहर गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने केलेल्या धडक कारवाईत एका सराईत गुन्हेगाराला दोन गावठी पिस्तुलं आणि एक जिवंत काडतूसासह अटक करण्यात आली.दिनांक २५ जून २०२५ रोजी सायंकाळी ४.४५ वाजता कल्याण पश्चिमेतील मोहने रोड, बंदरपाडा परिसरात ही कारवाई करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल तारमळे यांना गोपनीय माहिती मिळाली होती की सचिन गोपी उर्फ गोकुळ शिंदे (वय ३०, व्यवसाय फळविक्री, रा. बंदरपाडा, कल्याण पश्चिम) या इसमाकडे बेकायदेशीर शस्त्रं आहेत.

त्यानुसार रोशन किराणा स्टोअर्सजवळ सापळा रचून कारवाई करण्यात आली. शिंदे याच्याकडून दोन गावठी बनावटीच्या पिस्तुलांसह एक जिवंत काडतूस असा एकूण अंदाजे १ लाख ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.शिंदेविरोधात खडकपाडा पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ३, २५ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), १३५ अन्वये गु. र. नं. ५४७/२०२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक आरोपीस ३० जून २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.यापूर्वीही सचिन शिंदेविरुद्ध खडकपाडा पोलीस ठाण्यात भादंवि ३२६, ५०४, ३४ अन्वये आणि एनडीपीएस कायदा अंतर्गत गुन्हे दाखल आहेत.ही कारवाई पोलीस आयुक्त अशुतोष डुंबरे, सहआयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर आयुक्त डॉ. पंजाबराव उगले, उपायुक्त अमरसिंह जाधव, सहायक आयुक्त शेखर बागडे व विनायक घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल तारमळे यांच्या पथकाने केली.पथकातील अधिकारी व अंमलदार सपोनि कृष्णा गोरे, भुषण कापडणीस, पो.उ.नि. सुहास तावडे, संदीप भोसले, पो.ह.वा. ठाकुर, पाटील, गायकवाड, जाधव, गडगे, राठोड, कानडे, पावसकर, पो.ना. हासे, मधाळे, हिवरे, पो.शि. वायकर, ढाकणे, पाटील, शेजवळ, भोसले यांनी ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.

जमिनीच्या आरोग्यासाठी माती परीक्षण आवश्यक–कृषी कन्यांचे प्रात्यक्षिक शेतकऱ्यांच्या मनात जागरूकता निर्माण

सह्याद्रीचा राखणदार । वरोरा । प्रतिनिधी

तालुक्यातील जामगाव (बु.) येथे आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, वरोरा येथील अंतिम वर्षातील कृषीकन्यांनी शेतकऱ्यांसमोर माती परीक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी एक विशेष प्रात्यक्षिक आयोजित केले. या उपक्रमास शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या प्रात्यक्षिकामध्ये गायत्री राखुंडे, कोमल उरकुडे, दीक्षा रामटेके, वैष्णवी पवार, प्रगती पाखमोडे, सलोनी मेश्राम आणि मयुरी मेश्राम या कृषीकन्यांनी सहभाग घेतला. त्यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षण



का आवश्यक आहे, याची सखोल व सुस्पष्ट माहिती दिली.

त्यांनी सांगितले की, मातीतील पोषक घटक, सामू (कि), सेंद्रिय कर्ब यांचे योग्य प्रमाण हे पीक उत्पादनासाठी अत्यंत महत्त्वाचे असते. जर माती परीक्षण न करता अंदाजाने खतांचा वापर केला, तर उत्पादन खर्च वाढतो, मातीचे आरोग्य बिघडते आणि नापिकीची शक्यता निर्माण होते.या प्रात्यक्षिकात कृषीकन्यांनी मातीचा नमुना घेण्याची शास्त्रीय पद्धत प्रत्यक्ष दाखवली. शेतातील ६ ते ८ ठिकाणांहून सुमारे ६ ते ८ इंच खोलीपर्यंत माती घेतली जाते. हे नमुने एकत्र करून एक मिश्र नमुना तयार केला जातो. हा नमुना सावलीत वाळवून प्लास्टिक पिशवीत भरला जातो आणि नंतर प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवला जातो.या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या मनात माती परीक्षणाविषयी प्रत्यक्ष ज्ञान निर्माण झाले असून, जमिनीच्या आरोग्यासह पीक उत्पादनात वाढीसाठी हा मार्गदर्शक उपक्रम उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास कृषीकन्यांनी व्यक्त केला आहे.

खा.लंकेकडून वारकऱ्यांना गरमागरम वडापाव!

कुरकुरीत भजे,चहा,बिस्किट,बाटलीबंद पाणीही ;२ लाख वडापावचे नियोजन

खा.लंके यांची उपस्थिती

अल्पोपहार वितरणासाठी परिते येथे मंडप उभारणीच्या कामाची तयारी सुरू असून या अल्पोपहारासाठी विविध दानशुरांनी देणगी तसेच वस्तूच्या स्वरूपात योगदान दिले आहे. खा. नीलेश लंके यांनी या तयारीचा आढावा घेउन नियोजनात काही त्रुटी आहे का याची माहीती घेतली. दरम्यान २ ते ४ जुलै दरम्यान खा. लंके हे परिते येथे उपस्थित राहून वारकऱ्यांची सेवा करणार आहेत.

दिंडी चालकांचा सन्मान

पंढरीच्या दिशेने निघालेल्या वारकऱ्यांच्या अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आल्यानंतर त्या, त्या दिंडीतील दिंडी चालकाचा नीलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा संघटनेच्या वतीने खा. नीलेश लंके हे स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करणार आहेत.

खा. लंके यांचे आकर्षण

आपल्या खास शैलीमुळे राज्यातच नव्हे तर देशभर नावारूपास आलेल्या खासदार नीलेश लंके यांचेही वारकऱ्यांना आकर्षण असते. परिते येथे आल्यानंतर अल्पोपहाराअगोदर वारकरी खा. नीलेश लंके यांना गराडा घालून त्यांच्याशी संवाद साधतात. त्यांच्यासमवेत फोटो काढण्याचाही मोह त्यांना आवरत नाही. खा. लंकेही वारकऱ्यांसाठी वेळ देत त्यांच्याशी मनमोकळया गप्पा मारतात, त्यांच्यासमवेत सेल्फी घेत पुढील प्रवासासाठी शुभेच्छा देतात.





सह्याद्रीचा राखणदार । पारनेर । प्रतिनिधी

पंढरीच्या पांडूरंगाच्या दर्शनासाठी दिंडीने निघालेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा सेवाभावी संघटनेच्या वतीने २ जुलै ते ४ जुलै दरम्यान टेंभुर्णी ते पंढरपुर मार्गावर परिते, तालुका माढा येथे दोन लाख गरमागरम वडापावसह कुरकुरीत भजी, चहा, बिस्किट व बाटलीबंद पाण्याचे वितरण करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून खा. नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून वारकऱ्यांच्या सेवेसाठी नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येतात. लंके प्रतिष्ठानच्या आरोग्य विभागाकडून वारकऱ्यांना मोफत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. खा. लंके यांच्या सुचनेनुसार पारनेर बाजार समितीच्या वतीने वारकऱ्यांना पावसापासून संरक्षण करण्यासाठी रेनकोटचे वाटप करण्यात आले.

२ लाख पाणी बॉटल

परिते येथे या वितरणासाठी खास पत्र्याचे छत असेलल्या मंडपाची उभारणी करण्यात आली असून तिथे ८ भट्ट्यांद्वारे चहा, गरम बटाटा वडे, कांदा भजी तयार करण्यात येणार आहेत. त्यासाठी २५ आचारी तैनात ठेवण्यात येणार आहेत. तर खा. नीलेश लंके यांचे ५०० स्वयंसेवक अल्पोपहार वितरीत करण्यासाठी हजर असतील. २ लाख पाणी बॉटल तसेच २ लाख पावांचेही तीन दिवसांसाठी नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, स्वयंसेवकांसाठी भोजनाचीही व्यवस्था या ठिकाणी करण्यात आली आहे.

वारकऱ्यांची पसंती !

दिंडीदरम्यान गावोगावी वारकऱ्यांच्या सेवेसाठी भाविकांकडून विविध प्रकारचे जेवण तसेच अल्पोपहाराचे आयोजन करण्यात येत असते. नीलेश लंके प्रतिष्ठानकडून मात्र गरमागरम वडा पाव, भजी, चहा बिस्किटचे नियोजन करण्यात येत असल्याने वारकरी या अल्पोपहारास पसंती देत आवर्जुन वडापाव तसेच भजी, चहा बिस्किटचा आस्वाद घेतात.

स्थानिकांचाही सहभाग

खा.लंके यांचे महाराष्ट्रभर चाहते आहेत. सोलापूर तसेच पुणे जिल्ह्यातील खा. लंके प्रेमीही या उपक्रमात सहभाग नोंदवत स्वयंसेवकांची भूमिका पार पाडतात. या उपक्रमा साठी आपले आर्थिक तसेच वस्तूरूपात योगदानही देतात.

वर्धा रोडवरील बस थांब्यांवर प्रवाशांना मनस्ताप

काटोल डेपोच्या चालकाचा मनमानी कारभार;शिवसेनेचे निवेदन

सह्याद्रीचा राखणदार । वर्धा । प्रतिनिधी

काटोल-वर्धा मार्गावर धावणाऱ्या एस.टी. बस चालकांच्या मनमानीमुळे प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. प्रवासी थांब्यावर उभे असतानाही बस थांबत नाही, हे प्रकार वारंवार घडत असून यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.कारंजा घाडगे, कन्नमवारग्राम, बांगडापूर परिसरात विशेषतः काटोल ते वर्धा फेरीवरील बस चालकांकडून प्रवाशांची सुस्पष्टपणे अवहेलना केली जात आहे. थांब्यावर उभे असलेल्या प्रवाशांनी हात दाखवूनही बस न थांबवता पुढे निघून जाणे, ही प्रकारची गंभीर प्रवासीविरोधी वागणूक सातत्याने समोर येत आहे.

या प्रकारामुळे नागरिकांना वेळेवर ठिकाणी पोहोचण्यात अडथळा येतो. काही प्रवाशांना



पुन्हा दीर्घ वेळ बस थांब्यावर ताटकळत उभं राहावं लागतं. हे चित्र संपूर्ण वर्धा-काटोल मार्गावरील अनेक ठिकाणी दिसून येते. विशेषतः कन्नमवारग्रामजवळील जंगल शेजारी घडणारे हे प्रकार धोकादायकही ठरू शकतात.प्रवासी असलेल्या थांब्यावर बस थांबवणे हे चालकांचे कर्तव्य असून, प्रवाशांनी हात दाखवल्यानंतरही बस न थांबवणे म्हणजे प्रवाशांच्या हक्कांचे उल्लंघन होय.या गंभीर प्रकाराकडे लक्ष वेधून नियमभंग करणाऱ्या चालकांवर तातडीने कारवाई व्हावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे. याबाबत तालुका संघटक सम्राट सिंग ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते रोशन वरठी आणि बाबारावजी वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली संबंधित परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संबंधित चालकांच्या आचरावर लक्ष ठेवून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांतून केली जात आहे.

जमीन वाटपाच्या वादातून काकू व चुलत भावाची निर्घृण हत्या; तरुणाची विष प्राशन करून आत्महत्या

सह्याद्रीचा राखणदार । वर्धा । प्रतिनिधी

जमिनीच्या वाटपावरून सुरू असलेला कौटुंबिक वाद सोमवारी (ता. २७) भयंकर वळणावर गेला. अल्लीपूर शिवारात महेंद्र मोहिजे या तरुणाने आपल्या काकू व चुलत भावावर कुऱ्हाडीने हल्ला करून त्यांची निर्घृण हत्या केली. त्यानंतर स्वतः विष प्राशन करून आत्महत्या केली. या दुहेरी हत्येमुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.या घटनेत मृत्यू झालेले दोघे म्हणजे साधना सुभाष मोहिजे (वय ५५) आणि त्यांचा मुलगा नितीन सुभाष मोहिजे (वय २७) हे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, महेंद्र मोहिजे याने ही दोन्ही हत्याकांडं अंमलात आणली. महेंद्र व नितीन यांच्यात शेतीच्या धुराच्या वाटपावरून व जमिनी ठेक्यावर देण्याच्या मुद्द्यावरून गेल्या काही दिवसांपासून सतत वाद सुरू होता.

सोमवारी दुपारी हा वाद टोकाला गेला. रागाच्या भरात महेंद्रने कुऱ्हाड घेऊन आधी नितीनवर,



नंतर त्याच्या आई साधना मोहिजे यांच्यावर जोरदार वार केले. या दहशतवादी हल्ल्यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला. त्यानंतर महेंद्रने स्वतःही विष प्राशन करून आत्महत्या केली. काही वेळात त्याचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच अल्लीपूर पोलीस स्टेशनसह पोलीस अधीक्षक अनुराग जैन आणि अपर पोलीस अधीक्षक राहुल चौहान यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेत मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी वर्धा जिल्हा रुग्णालयात पाठवले.या प्रकरणी पोलिसांनी शेजारी व नातेवाईकांचे जबाब नोंदवण्यास सुरुवात केली असून, पुढील तपास सुरू आहे. तिहेरी मृत्यूमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे आणि हळहळ व्यक्त करणारे वातावरण पसरले आहे.

चंद्रपूर येथे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलनात विनोद सातपुते यांचा सत्कार

नमिता पाठक यांना पर्यावरण भूषण पुरस्कार

सह्याद्रीचा राखणदार । वर्धा । प्रतिनिधी

चंद्रपूर येथील कामगार मनोरंजन केंद्र, उर्जानगरमधील एकदंत सभागृहात दिनांक २२ जून २०२५ रोजी पर्यावरण संवर्धन व विकास समिती, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २५ वे राज्यस्तरीय पर्यावरण संमेलन मोठ्या उत्साहात पार पडले.या संमेलनात सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्था व व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. वर्धा येथील पर्यावरण कार्यकर्ते विनोद सातपुते यांचा वृक्ष व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे विदर्भाध्यक्षा नमिता पाठक यांना पर्यावरण भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमात वर्धा जिल्ह्यातील



जिल्हाध्यक्षा विजया रोकडे, सुषमा जामुनकर व ज्योत्स्ना वागदे यांचा देखील सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे संस्थापक, दलितमित्र व आदिवासी सेवक मा. डी. के. आरिकर होते. तर संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ. बळवंत भोयर (नागपूर) यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून सत्यशोधक समाजाचे जिल्हाध्यक्ष ॲड. हिराचंद बोरकुटे, रिनाताई पांडे (मुंबई), डॉ. तुकाराम धोबे, डॉ. देव कन्नाके, टेमराज भाले, सुरेखा रडके, विनोद दोंदल, अर्चना राठोड, एलीजा बोरकुटे, अतुल कोल्हे आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात पिंपळाच्या वृक्षपूजनाने करण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांनी पर्यावरण जागृतीसाठी पथनाट्य सादर करून 'वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा' हा संदेश दिला.

तांभा ग्रामपंचायतीच्या हलगर्जी कारभाराविरोधात मनसे आक्रमक

सात दिवसांत काम न झाल्यास आंदोलनाचा इशारा

सह्याद्रीचा राखणदार । देवळी । प्रतिनिधी

गावातील मूलभूत सुविधांची दुरवस्था, स्वच्छतेचा अभाव आणि नागरिकांच्या समस्या यांकडे ग्रामपंचायतीकडून होत असलेले दुर्लक्ष यामुळे तांभा गावातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. यशवंत ग्रामपंचायत पुरस्कार प्राप्त असलेल्या या गावाचा कारभार सध्या बेजबाबदारपणे सुरू असून, ग्रामपंचायतीकडून सातत्याने होणाऱ्या हलगर्जीपणाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. मनसेचे तांभा शाखाध्यक्ष प्रमोद मडावी यांनी ग्रामपंचायत सचिव व प्रशासक यांना निवेदन देत स्वच्छता, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक आरोग्य या बाबतीत वारंवार तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा आरोप केला.गावातील अनेक भागांमध्ये पावसामुळे साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. काही घरासमोर कायमस्वरूपी डबकी तयार होत असून, रस्त्यांवर ढोरं बांधणे आणि खताचे ढिगारे टाकण्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. यामुळे गावात गंभीर आरोग्यसंकट निर्माण झाले आहे.ग्रामपंचायतीच्या साईटवरील पाण्याच्या टाकीचे सिमेंट पूर्णतः झिजले असून, लोखंडी सळ्या



उघड्या पडल्या आहेत. काही ठिकाणी पाईपलाइन तुटलेली आहे. विशेषतः गणेश मेश्राम यांच्या घरासमोरील पाण्याची टाकी अत्यंत धोकादायक अवस्थेत आहे. यामुळे कोणतीही जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.मनसेने प्रशासनाला सात दिवसांची मुदत देत तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अन्यथा ग्रामपंचायतीविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

मी ठाकरे बंधूंचा मोर्चा निघूच देणार नाही

मुंबई । वृत्तसंस्था

हिंदीच्या सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी संयुक्तपणे ५ जुलै रोजी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. यामुळे अवघ्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले असताना आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या मोर्चाला कडाडून विरोध दर्शवला आहे. आपण कोणत्याही स्थितीत हा मोर्चा निघू देणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी या प्रकरणी राज ठाकरे यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचीही मागणी केली आहे. यामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरूवारी हिंदीच्या सक्तीविरोधात ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली. या मोर्चात ठाकरे गटानेही सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे राज व उद्धव ठाकरे अनेक वर्षांनंतर एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणी राजकीय वर्तुळात संमिश्र प्रतिक्रिया उमटत असताना गुणरत्न सदावर्ते यांनी या मोर्चाला कडाडून विरोध दर्शवला आहे. मी राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांचा मोर्चा निघू देणार नाही. हा मोर्चा म्हणजे ठणठण गोपाळा आहे. जे नियम सर्वसामान्य नागरिकांना आहेत, तेच नियम यांनाही लागू असले पाहिजेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकीतच राज ठाकरे यांची भेट घेतली. मला या भेटीवर भाष्य करायचे नाही. पण राज व उद्धव ठाकरे खोटे नरेटिव्ह पसरवत आहेत. त्याला आमचा विरोध आहे. ठाकरेंचा मोर्चा अन्यायकारी आहे. कोर्टाच्या निर्देशांनुसार त्यांना मोर्चा काढता येणार नाही. त्यांचा मोर्चा बेकायदेशीर आहे. हा बाळगोपाळांचा मोर्चा आहे.राज्याच्या राजकारणात राज ठाकरे यांची स्थिती हसण्यासारखी झाली आहे. ते भाषा व सांप्रदायिकतेच्या नावाने वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. या मोर्चाच्या माध्यमातून काहीतरी घडवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांच्या मोर्चाला अद्याप पोलिसांनी परवानगी दिली नाही. त्यामुळे पोलिसांनी प्रतिबंधात्मक कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले पाहिजे. ते हा मोर्चा गल्लीतील निवडणुकीसाठी काढत आहेत, असे गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले आहे.

दुसरीकडे, मनसे नेते अविनाश जाधव यांनी गुणरत्न सदावर्ते हा भाजपने पाळलेला माणूस असल्याची टीका केली आहे. गुणरत्न सदावर्ते हा भाजपने पाळलेला माणूस आहे. यापूर्वी त्यांनी सिद्धिविनायक मंदिराच्या विषयातही उडी घेतली होती. त्यांच्यात एवढीच हिंमत असेल तर तिकडे दक्षिण भारतात जावे. ते स्वतःला एवढे ज्ञानी समजत असतील, तर त्यांनी तिकडे जाऊन विरोध करून दाखवावा.सदावर्ते ज्या पद्धतीने मराठी माणसांविरोधात काम करतात, ते पाहता मराठी माणूस एक दिवस त्याला घराबाहेर पडू देणार नाहीत. मी खात्रीने सांगतो, याला मराठी माणूस एक दिवस जाम चोपेल. आमची भाजपला विनंती आहे की, त्यांच्या तोंडाला पट्टी बांधावी. अन्यथा त्यांच्या तोंडात एकही दात उरणार नाही, असा इशाराही अविनाश जाधव यांनी यावेळी बोलताना सदावर्ते यांना दिला आहे.


दैनिक सह्याद्रीचा राखणदार

१८ वर्षांच्या तरुण लेखक व शास्त्रज्ञ विवान करुळकर यांचं एलॉन मस्क यांच्यावर प्रेरणादायी चरित्रग्रंथ प्रकाशित

सह्याद्रीचा राखणदार । नितीन बोंबाडे । पालघर

नव्या भारतात वैज्ञानिक दृष्टिकोन, सनातन मूल्ये आणि जागतिक दृष्टिकोन यांचा संगम साधणारा एक तरुण तेजस्वी लेखक म्हणजे विवान करुळकर. वयाच्या केवळ अठराव्या वर्षी त्याने प्रसिद्ध जागतिक उद्योगपती एलॉन मस्क यांच्या जीवनावर आधारित एलॉन मस्क : प्रत्यक्ष वास्तवाला वाकवणारा माणूस हा प्रेरणादायी चरित्रग्रंथ प्रकाशित केला आहे.विवान करुळकर हे केवळ लेखकच नाहीत, तर एक नावीन्यपूर्ण विचारधारा असलेले तरुण शास्त्रज्ञ देखील आहेत. वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी पृथ्वीच्या जवळ फिरणाऱ्या खगोलीय वस्तूंवरील संशोधनावर तत्त्वतः पेटंट मिळवले आणि ते जगातील अशा प्रकारचे यश मिळवणारे सर्वांत कमी वयाचे संशोधक ठरले. हे यश त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचं प्रतीक आहे.

लेखन हे केवळ त्यांचं व्यासंगाचं माध्यम नसून, त्यांच्या अंतरंगातून उमटणाऱ्या शोध आणि श्रद्धेचा प्रवास आहे. त्यांच्या लेखनयात्रेची सुरुवात सनातन धर्म : सर्व विज्ञानाचा खरा स्रोत या ग्रंथाने झाली. हा ग्रंथ २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या गर्भगृहात श्री. चंपतराय यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. त्यानंतर त्यांच्या दुसऱ्या ग्रंथाने वाचकांना वेगळ्या दिशेने विचार करायला भाग पाडलं सनातन धर्म : सर्व तंत्रविद्येचा खरा स्रोत या ग्रंथाचे प्रकाशन १५ नोव्हेंबर २०२४ रोजी प. पू. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत व भारतीय अवकाश संस्था प्रमुख श्री. एस. सोमनाथ यांच्या हस्ते झाले.ही दोन्ही पुस्तके विज्ञान व धर्म यांच्यातील साम्य शोधणारी होती. मात्र, यावेळी विवानने



आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योगजगतातील क्रांती घडवणाऱ्या एलॉन मस्क यांना केंद्रस्थानी ठेवून तिसरा ग्रंथ लिहिला आहे. वयाच्या आठव्या वर्षापासून मस्क यांना आदर्श मानणारा विवान गेली अनेक वर्षे त्यांच्यावर सखोल अभ्यास करत होता. त्यांची जीवनशैली, काम करण्याची पद्धत, धाडसी निर्णय घेण्याची क्षमता आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टींना शक्य करण्याची वृत्ती हे सगळं विवानने आपल्या अभ्यासातून समजून घेतलं आणि त्यातून हा ग्रंथ जन्मास आला.

एलॉन मस्क : प्रत्यक्ष वास्तवाला वाकवणारा माणूस या ग्रंथात मस्क यांच्या जीवनातील अनेक अज्ञात पैलू, त्यांच्या निर्णयांची पार्श्वभूमी, यशस्वीतेमागचं तत्त्वज्ञान आणि त्यांनी घेतलेल्या मोठमोठ्या जोखमी यांचं अत्यंत अभ्यासपूर्ण आणि प्रेरणादायी विश्लेषण केलं आहे. हे पुस्तक फक्त माहिती देणारं नाही, तर वाचकाला अंतर्मुख करून नव्या प्रेरणेची ठिणगी देणारं आहे.या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा एलॉन मस्क यांच्या वाढदिवशी २८ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. विवानची इच्छा आहे की, हा ग्रंथ तो स्वतः एलॉन मस्क यांच्यापर्यंत पोहोचवेल. ही भेट केवळ एक पुस्तक न राहता, आदर व प्रेरणेचे प्रतीक ठरेल.

विवान करुळकर यांचा जीवनप्रवास नव्या पिढीसाठी दीपस्तंभ ठरावा, असं वाटतं. त्यांच्या लेखनात विज्ञान, श्रद्धा, अभ्यास, आणि जागतिक विचारांची जी एकत्रित झलक आहे, ती आजच्या तरुणांसाठी दिशादर्शक ठरू शकते. त्यांच्या लिखाणातून नवा भारत घडवण्याची ऊर्जा उमटत आहे.

अंगुलीमाल उराडे प्राणी मित्र पुरस्काराने सन्मानित

सह्याद्रीचा राखणदार । मूल । प्रतिनिधी

साहित्यरंग साहित्य मंच, नाशिक यांच्यावतीने आयोजित कवी संमेलन व सन्मान सोहळा २०२५ नुकताच आय.एम.आर. महाविद्यालय, जळगाव येथे दिनांक २२ जून रोजी पार पडला. या कार्यक्रमात चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील बेंबाळ येथील सामाजिक कार्यकर्ते व कवी अंगुलीमाल मायाबाई उराडे यांना समाजसेवा प्राणीमित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.अंगुलीमाल उराडे हे सामाजिक, साहित्यिक आणि पर्यावरणपूरक क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहेत. ते एक निसर्गप्रेमी सर्पमित्र असून, आतापर्यंत त्यांनी अनेक सापांचे प्राण वाचवून त्यांना सुरक्षितपणे वनविभागाच्या स्वाधीन केले आहे. त्यांची ही सेवाभावी वृत्तीच त्यांना प्राणीमित्र या पुरस्कारासाठी पात्र ठरवते.

साहित्य क्षेत्रातही त्यांचा ठसा उमटलेला आहे. नुकताच त्यांचा हे विश्व शब्दांचे हा कवितासंग्रह प्रकाशित झाला असून, या



काव्यसंग्रहाला संपूर्ण महाराष्ट्रभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. याच साहित्यिक कार्याची दखल घेत त्यांना नाशिक येथील साहित्यरंग साहित्य मंच या संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार देण्यात आला. त्यांच्या या सन्मानामुळे तालुक्यात अभिमान व्यक्त करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात आयोजित कवी संमेलनातही अंगुलीमाल उराडे यांनी आपल्या सशक्त कविता सादर करत रसिकांची मने जिंकली. कला फाउंडेशनचे अध्यक्ष प्रशांत दामले यांनी त्यांच्या कवितेला भरभरून दाद दिली आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध गझलकार यशवंत पगारे होते. सुधीर महाजन यांनी स्वागताध्यक्ष म्हणून भूमिका बजावली. प्रमुख पाहुणे म्हणून मदनराव कुलकर्णी, जनाबाई हिरे, प्रकाश पाटील, सुशीलकुमार शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते अंगुलीमाल उराडे यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

शेतकऱ्यांनो,हिरवळीचं खत एकदा वापरून पाहाच

जामगावात कृषी कन्यांचा मार्गदर्शन उपक्रम

सह्याद्रीचा राखणदार । वरोरा । प्रतिनिधी

हिरवळीचं खत म्हणजे जमिनीला दिलेली नैसर्गिक उभारी,असं प्रतिपादन करत आनंद निकेतन कृषी महाविद्यालय, आनंदवन वरोरा येथील कृषीकन्यांनी ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत जामगाव येथील शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केलं.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला संलग्नित या महाविद्यालयाच्या सातव्या सत्रातील विद्यार्थिनींनी हिरवळीच्या खतांचा उपयोग, त्याचे प्रकार व फायदे यावर माहितीपर सत्र घेतलं. हिरवळ खत म्हणजे घेवडा, गिरीपुष्प, कडुनिंब, करंज यासारख्या वनस्पतींची पाने व कोवळ्या फांद्या जमिनीत पुजवून मिळणारे जैविक खत.

या खताचे दोन प्रकार शेतकऱ्यांना समजावून सांगण्यात आले – एक म्हणजे शेतातच लागवड करून घेतले जाणारे (उदा. मुग, उडीद, बोरू), तर दुसरे म्हणजे बाहेरून आणून वापरण्यात येणारे हिरवे घटक. हे



खत रासायनिक खतांना पर्याय ठरते, जमिनीतील सेंद्रिय घटक वाढवते, तण व किडींचं नियंत्रण करते तसेच फायदेशीर सूक्ष्मजीवांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करते, असेही कृषीकन्यांनी नमूद केले.

या उपक्रमात प्रगती पाखमोडे, गायत्री राखुंडे, कोमल उरकुडे, मयुरी मेश्राम, दिशा रामटेके,वैदवी पवार, सलोनी मेश्राम या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.या उपक्रमास शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. पोतदार, ग्रामीण कृषी कार्यानुभव प्रभारी डॉ. आर. व्ही. महाजन, समन्वयक राहुल तायडे व पल्लवी घोरपडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

उपसरपंच सुधीर अकलाडे यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

माजी खासदार हिना गावित यांच्या वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम

समाजाभिमुख कार्याचा आदर्श

सुधीर अकलाडे यांचा हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक प्रेरणा ठरला आहे. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मकता निर्माण करण्याबरोबरच लोकप्रतिनिधींकडून समाजोपयोगी कार्य कसे व्हावे, याचा वस्तुपाठ त्यांनी उभा केला आहे.



सह्याद्रीचा राखणदार । धुळे । उमाकांत अहिरराव

साक्री तालुक्यातील देगांव, गव्हाणीपाडा, उंभर्टी, उंभरे, मलांजन, शेनपूर, कुसुबा या गावांतील जिल्हा परिषद व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. माजी खासदार व संसदरत्न पुरस्कार प्राप्त हिना गावित यांच्या वाढदिवसानिमित्त उपसरपंच सुधीर अकलाडे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.सामान्यतः वाढदिवसानिमित्त फुलगुच्छ किंवा केक कापण्याचे कार्यक्रम होत असताना, सुधीर अकलाडे यांनी या प्रथेपासून वेगळा विचार करत विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप करून एक सामाजिक भान जपणारा आदर्श उभा केला. त्यांच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

प्रत्येक गावात झालेल्या या कार्यक्रमात ज्येष्ठ भटू जिभाऊ अकलाडे, प्रकाश अकलाडे, सरपंच सुरेखा गायकवाड (देगाव), सुभाष अकलाडे, प्रमोद अकलाडे, भीमराव अहिरे, कमलेश शेवाळे, अनिल अहिरे, सुषमा भामरे, भटू भदाणे, नरेंद्र अहिरे, राकेश शेवाळे, संजय सोनवणे, महेंद्र सावंत, आप्पा सर भदाणे, जगदीश शिंदे सर, पुष्पलता संभाजीराव पगारे, छायाताई स्वप्नील पगारे, स्वप्नील संभाजीराव पगारे, अविनाश शेवाळे, किशोर गवळी, मनोज अकलाडे, प्रशांत अकलाडे, स्वप्नील अकलाडे, विजय दहीते, भिकन दहीते, कांतिलाल सुर्वे, पंडित अहिरे, दगडु देसले, काशिनाथ अहिरे, मोहन अहिरे, राजेश माळी यांच्यासह अनेक ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

अखेर मारुती मंदिर परिसरा तील काँक्रीटीकरणास सुरुवात

फारुक जमादार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश



सह्याद्रीचा राखणदार । सोलापूर । प्रतिनिधी

करमाळा नगरपरिषदेमार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या श्री मारुती मंदिर परिसरातील काँक्रीटीकरणाच्या कामास अखेर सुरुवात झाली आहे.सदर कामाची वर्क ऑर्डर संबंधित ठेकेदारास पूर्वीच देण्यात आली होती. मात्र, ठेकेदाराने तब्बल सहा महिने उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू केले नव्हते. या कामाच्या विलंबाची दखल माजी नगरसेवक फारुक जमादार यांनी घेतली आणि मागील तीन–चार महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. याप्रकरणी त्यांनी १७ मार्च २०२५ रोजी उपोषण करण्याचा इशारा देत पालिकेस लेखी निवेदन दिले होते. त्यानंतर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि बांधकाम अभियंता यांनी लेखी आश्वासन देत काम लवकरच सुरू करण्याचे मान्य केले. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून सध्या या कामास प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे.


श्री हनुमान विद्यालयात तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे रिंगण सोहळ्याने स्वागत

विद्यार्थ्यांनी घेतला भक्तिमय वातावरणात वारकरी बनण्याचा अनुभव

सह्याद्रीचा राखणदार । इंदापूर । दत्तात्रय गवळी

श्री हनुमान विद्यालय, अवसरी येथे संतश्रेष्ठ तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशात दिंडी काढत भक्तिरसात न्हालेला अनोखा अनुभव घेतला. टाळ, मृदंग, भगवी पताका आणि ओठांवर हरिनामाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर पांडुरंगमय झाला होता.सकाळी ९ वाजता विद्यालयात फुलांनी सजवलेली पालखी तयार करून, त्यात विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीची स्थापना करण्यात आली. ज्ञानोबा-तुकारामच्या गजरात ही पालखी गावातून व मंदिर परिसरातून मिरवणुकीसाठी नेण्यात आली. अंगी पारंपरिक वारकरी वेश, गळ्यात टाळ आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेली विद्यार्थिनी, तसेच भगवी पताका घेऊन चालणारे विद्यार्थी यांनी हा संपूर्ण सोहळा चैतन्यमय केला.पालखी श्री हनुमान मंदिराच्या परिसरात पोहोचल्यावर रिंगण सोहळ्यास प्रारंभ झाला. टाळकरी, झेंडेकरी आणि तुळशीवृंदावन घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी जोरदार जयघोष करत रिंगण पूर्ण केलं. त्यानंतर अन्य विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्साहात रिंगणात सहभाग घेत भक्तिरसात चिंब चिंब भिजले. काहींनी फुगडी खेळली, तर काही विद्यार्थ्यांनी फेर धरून अभंग गायनात सहभाग घेतला.

या सोहळ्यानंतर विद्यालयाच्या मैदानात पारंपरिक पद्धतीने पालखीची आरती करण्यात आली. यावेळी माजी मुख्याध्यापिका व संस्थेच्या सचिव विजया शिंगटे यांच्या हस्ते व विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण लोंढे, कर्मयोगी सहकारी साखर कारखान्याचे संचालक शांतीलाल शिंदे पाटील, समाजसेवक भालू मोरे यांच्या उपस्थितीत आरती पार पडली. ग्रामस्थ, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.आरतीनंतर विद्यार्थ्यांनी आपआपल्या घरून आणलेली भाजी-भाकरी एकत्र करून काला तयार केला आणि एकत्रित सहभोजनाचा आनंद घेतला. यावेळी सर्व सुखाचे मूळ समता आणि विठ्ठल या उक्तीचा अनुभव सर्वांनी घेतला. विश्व एकच आहे, भेदभाव मनुष्याचा; प्रेम ठेवा सर्वजण! या शिकवणीचा प्रत्यक्ष प्रत्यय विद्यार्थ्यांना या निमित्ताने आला. शाळेतील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष वारकरी परंपरेचा अनुभव देत भक्ती, समता, बंधुता आणि एकात्मतेचे संस्कार देण्याचा उद्देश या सोहळ्यामागे होता. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळीच सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी दत्तात्रय गवळी व नाना घळके यांनी परिश्रम घेतले. त्यांना अरुण रसाळ, तानाजी राऊत, अरुणा कवडे (सांस्कृतिक विभाग प्रमुख), ज्योती लोंढे यांचे सक्रिय सहकार्य लाभले. तसेच बाल मृदंग वादक कृष्णा कदम, हरिदास कवितके, राजेंद्र पेंडवळे, प्रकाश मगर, अजिंक्य जाधव यांचे योगदान उल्लेखनीय होते. विद्यार्थ्यांच्या समवेत त्यांचे पालक आणि ग्रामस्थ सुद्धा या अनोख्या भक्तिरसात सहभागी होऊन आपली सांस्कृतिक परंपरा जपण्याचा अनुभव घेऊ शकले.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .